॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

पत्र पेटी क्र. ८०, उमवि नगर, जळगाव -४२५ ००१

## जाहीर प्रकटन

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा शैक्षणिक वर्ष २०१९-२० ते २०२३-२४ या पाच वर्षांसाठी शास्त्रोक्त पध्दतीने तयार केलेल्या बृहत विकास आराखडयास अनुसरुन महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १०९ यामधील तरतूदीच्या अनुषंगाने विद्यापीठाशी संलग्नित असलेली महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांमध्ये नवीन विषय, नवीन अभ्यासक्रम, नवीन विद्याशाखा, नवीन अतिरिक्त तुकडी, विद्यार्थी संख्या वाढ, सेकंड शिफ्ट इत्यादीं विस्ताराचे अर्ज **दिनांक ३०/०९/२०२० किंवा तत्पूर्वी** ऑनलाईन पध्दतीने सादर करणेसाठी विद्यापीठातर्फे जाहीर आवाहन करण्यांत येत आहे.

उपरोक्त नमूद केलेले अर्ज ऑनलाईन पध्दतीने सादर करण्यासाठी विस्तृत स्वरुपातील माहिती विद्यापीठाच्या **www.nmu.ac.in** या संकेतस्थळावर Homepage वरील R & D या विभागातील Affiliation वर pointer ठेऊन त्यातील Online Affiliation या Link वर click करुन **Proposal Guidelines २०२१-२२** येथे उपलब्ध असून अर्ज भरतेवेळी helpline देण्यांत आलेली आहे. शासनाने यासंदर्भात वेळोवळी निर्गमित केलेले शासन निर्णय, विद्यापीठाचा संलग्नता शुल्काचा तक्ता, प्रक्रिया आदि शुल्काचे परिपत्रक, वेळापत्रक व इतर सविस्तर माहिती आणि संबंधित परिपत्रके त्याचठिकाणी **Important G.R./ Circulars** आणि **Other G.R./ Circulars** या Link वर उपलब्ध करुन देण्यांत आलेली आहेत.

तरी उपरोक्त Link मध्ये नमूद केलेल्या सूचनांचे अवलोकन करुन त्यानुसार ऑनलाईन प्रणालीव्दारे परिपूर्ण अर्ज भरुन त्याची हार्ड कॉपी आवश्यक तेवढ्या प्रतींत आवश्यक त्या कागदपत्र व शुल्कासह **दिनांक ३०/०९/२०२० किंवा तत्पूर्वी संलग्नता विभागात सुटीचे दिवस वगळून समक्ष सादर करावेत.** अपूर्ण भरलेले, अपूर्ण दस्तऐवज असलेले, साक्षांकीत नसलेले कागदपत्र व मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

ठिकाण:-जळगांव
दिनांक:- १६/०९/२०२०

**(प्रा. डॉ. बी.व्ही. पवार)**
**प्र.कुलसचिव**